| | | | |
|---|---|---|---|
| MHST150009652022 | दाखल दिनांक | : | ०७.०७.२०२२ |
| | नोंदणी दिनांक | : | ०७.०७.२०२२ |
| | निकाल दिनांक | : | ०८.०७.२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०४ ०० ०१ |

**वडूज येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी**
**तालुका खटाव, जिल्हा सातारा यांचे न्यायालयात**
**पिठासीन अधिकारी : एम.आय.एस. दर्यावर्दी)**
(न्यायनिर्णय : दिनांक ०८.०७.२०२६)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३५२/२०२२** **निशाणी क्र. १७**

**प्रथम खबरी अहवाल/गुन्हयाचा तपशील –**
गुन्हा नोंद क्र. : ५०/२०२२
पोलीस ठाणे : औंध पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | **महाराष्ट्र शासन,**<br>मार्फत पोलीस ठाणे औंध पोलीस ठाणे<br>तालुका खटाव, जिल्हा सातारा. |
| **सरकारी अभियोक्ता** | | श्री. पी. व्ही. जोशी |
| **आरोपी** | | **जगन्नाथ बबन पिसाळ**<br>वय : ३८ वर्षे, व्यवसायः शेती,<br>रा.चोराडे, तालुका खटाव, जिल्हा सातारा |
| **आरोपींतर्फे वकील** | | श्री. बी. जी. तोडकर. |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १३.०३.२०२२ |
| प्रथम खबर अहवाल दाखल झाल्याचा दिनांक | १४.०३.२०२२ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०७.०७.२०२२ |
| आरोपीचे निवेदन नोंदविलेचा दिनांक | २४.०५.२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०४.०९.२०२४ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | – |
| न्यायनिर्णय दिनांक | ०८.०७.२०२६ |
| शिक्षा सुनावल्याचा दिनांक, असल्यास | –– |

## आरोपींचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामीनवर सोडल्याचा दिनांक | आरोप केलेले गुन्हे | आरोपीस शिक्षा किंवा निर्दोष मुक्त केले. | सुनावण्यात आलेली शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ नुसार संपरिक्षे दरम्यान आरोपी न्यायबंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जगन्नाथ बबन पिसाळ | फौ. प्र. सं. कलम ४१ अ प्रमाणे नोटिस | १२.०४.२०२४ | भा.दं. वि. कलम २८५ अन्वये | निर्दोष मुक्त केले. | निरंक | निरंक |

## अभियोगपक्ष, बचावपक्ष, न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. अभियोगपक्षाचे साक्षीदार

| सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | प्रशांत प्रकाश पाटील (नि.११) | साक्षीदार |
| २ | बापुसाहेब नारायण जाधव (नि.१४) | साक्षीदार |

### ब. बचावपक्षाचे साक्षीदार, असल्यास–

| सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यास**

| सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष, बचावपक्ष, न्यायालयीन निशाणींची यादी**

**अ. अभियोगपक्ष–**

| अ.क्र. | निशाणी क्र. | निशाणी क्रमांकाचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ब. बचावपक्ष –**

| अ.क्र. | निशाणी क्र. | निशाणी क्रमांकाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशाणी –**

| अ.क्र. | निशाणी क्र. | निशाणी क्रमांकाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**मुद्देमालाचा तपशील**

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचा प्रकार |
|---|---|---|
| १. | एम. आर. नं. ६/२०२२ | एक लाल रंगाची एच. पी. कंपनीची वापरातील सिलेंडरची टाकी. |

## न्यायनिर्णय

## दिनांक ०८.०७.२०२६

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान संहिताचे कलम २८५ अन्वये सदरचा गुन्हा दाखल केला आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे**:–

**०२.** फिर्यादी भिमराव राजाराम वळकुंदे यांनी फिर्याद दिली की, दिनांक १३.०३.२०२२ रोजी सकाळी ०८.०० वाजता अतिक्रमण डयुटी बंदोबस्ताकरीता ते मौजे चोराडे गावचे हद्दीतील चोराडे फाटा येथे ते, सहाय्यक पोलिस निरिक्षक बधे, सहाय्यक पोलिस फौजदार जाधव, पोलिस हवालदार पाटील, वाघ, कांबळे, भोसले, पोलिस नाईक पाडळे, महिला पोलिस नाईक काळे, महिला पोलिस कॉन्स्टेबल साळुंखे, पोलिस कॉन्स्टेबल कटरे, वळकुंदे, जायकर, हिरवे व चालक पोलिस कॉन्स्टेबल पोळ असे गेले असता चोराडे फाटा येथील चौकामध्ये रात्री १९.०० वाजणेचे सुमारास त्यांचे असे निदर्शनास आले की, आरोपी जगन्नाथ हा ज्वलनशील गॅस उघडयावरती ठेवून त्याचा स्फोट होईल किंवा अनुचित प्रकार घडून जिवीतहानी व वित्तहानी होईल हे माहित असून सुध्दा तो विनापरवाना उघडयावरती सार्वजनिक ठिकाणी हॉटेल व्यवसायाकरीता वापर करीत असताना मिळून आला. सबब सदरची फिर्याद आहे.

**०३.** आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान संहिताचे कलम २८५ अन्वये गुन्हा क्र. ५०/२०२२ नोंदवुन पुढील तपास पोलीस हवालदार, एस. एन. कोळी यांचेकडे देण्यात आला. तपासादरम्यान आरोपींविरुध्द सबळ पुरावा मिळाल्याने त्यांचेविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**०४.** या खटल्याममध्ये आरोपी हजर झालेवर निशाणी ९ वर भारतीय दंड विधान संहिताचे कलम २८५ अन्वये आरोपीचे निवेदन नोंदवले. आरोपीने आरोप नाकारुन संपरिक्षेला सामोर जाण्याची पसंती दर्शविली.

**०५.** प्रस्तुत प्रकरणात आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे निवेदन निशाणी १६ वर नोंदवले असता आरोपीने त्यांचेविरुध्द खोटी केस केली असल्याचा बचाव घेतला.

**०६.** अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपी यांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

**०७.** उपलब्ध पुरावा व आरोपीचा बचाव पाहता माझे विचाराधीन खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित झालेले आहेत. त्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने असे शाबीत केले आहे काय की, दिनांक १३.०३.२०२२ रोजी १९.०० वाजताचे सुमारास मौजे चोराडे, ता. खटाव गावचे हद्दीत चोराडे फाटा येथील चौकामध्ये आरोपी हा ज्वलनशील गॅस उघडयावरती ठेवून त्याचा स्फोट होईल किंवा अनुचित प्रकार घडून जिवीतहानी व वित्तहानी होईल हे माहित असून सुध्दा विनाकारण उघडयावरती सार्वजनिक ठिकाणी हॉटेल व्यवसायासाठी वापरत असताना मिळून आला म्हणून भारतीय दंड विधान संहिताचे कलम २८५ अपराध केला ? | नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## –:– <u>का र ण मि मां सा</u> –:–

**०८.** प्रस्तुत खटल्यात आरोपी हा ज्वलनशील गॅस उघडयावरती ठेवून त्याचा स्फोट होईल किंवा अनुचित प्रकार घडून जिवीतहानी व वित्तहानी होईल हे माहित असून सुध्दा विनाकारण उघडयावरती सार्वजनिक ठिकाणी हॉटेल व्यवसायासाठी वापरत असताना मिळून आला. त्यामुळे गु. र. क्र. ५०/२०२२ नोंदविण्यात आला. अभियोगपक्षातर्फे निश्चीत केलेले दोषारोप शाबीत करण्याकरिता अभियोगपक्षातर्फे प्रकरणात एकूण दोन साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली.

<u>**मुद्दा क्र. १ करीता**</u>:–

**०९.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेला साक्षीदार क्र. १ प्रशांत प्रकाश पाटील यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, दिनांक १३.०३.२०२२ रोजी त्यांची औंध पोलिस स्टेशन येथे नमुणक होती. त्या दिवशी चोराडे गावच्या हद्दीत अतिक्रमण बंदोबस्त चालू होता. त्यावेळी सहाय्यक पोलिस निरिक्षक बदे, ते व इतर पोलिस कर्मचारी होते. संध्याकाळी त्यांचे लक्षात आले की, आरोपी जगन्नाथ बबन पिसाळ हा हॉटेल व्यवसायासाठी ज्वलनशील सिलेंडर स्फोट होईल अशा रितीने ठेवून जिवीत व वित्तहानी होण्याची शक्यता आहे अशा प्रकारे ठेवले होते. त्यानंतर ते सिलेंडर दोन पंचासमक्ष जप्त केले. सदरचा सिलेंडर एच.पी. कंपनीचा लाल रंगाचा होता. सदर आरोपीकडे परवाना नव्हता. त्यामुळे होळकुंदे यांनी फिर्याद दिली.

**१०.** आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या साक्षीदार क्र. १ यांनी उलटतपासात मान्य केले की, चोराडे फाटा येथे चायनीज, वडापाव, मिठाई व इतरही दुकाने असून सदर परिसर गजबजलेला असतो. त्यांनी ज्या ठिकाणी छापा मारला त्या ठिकाणाचा मिळकत क्रमांक त्यांना सांगता येणार नाही. तसेच जप्त केलेल्या सिलेंडर बॅच नंबर त्यांना सांगता आला नाही. सदर साक्षीदाराने उलटतपासात सर्व सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

**११.** साक्षीदार क्र.२ बापूसाहेब नारायण जाधव यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले की, दिनांक ०३.०६.२०२२ रोजी ते औंध पोलिस स्टेशन येथे कार्यरत होते. दिनांक १३.०३.२०२२ रोजी सकाळी ०८.०० वाजणेचे सुमारास सहाय्यक पोलिस निरिक्षक बदे यांच्यासह अतिक्रमण काढण्याकरीता चोराडे फाटा येथे औंध पोलिस ठाण्याचे कर्मचारी यांच्यासह ते गेले होते. सदर ठिकाणी १९.०० वाजता अतिक्रमण काढीत असताना जगन्नाथ पिसाळ हे उघडयावर हॉटेल व्यवसाय करीत होते व एच.पी. गॅस सिलेंडरचा वापर करीत होते. तेथे पोलिस पाटील यांनी पाहणी

करुन सदरचा सिलेंडर दोन पंचासमक्ष जप्त केला. त्यांनी सदरचा मुद्देमाल पोलिस स्टेशनला आणला व वडकुंदे यांनी आरोपी विरुध्द फिर्याद दाखल केली. पोलिसांनी त्यांचा जबाब घेतला असून आरोपीला त्यांनी न्यायालयात ओळखले.

**१२.** आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात साक्षीदार क्र.२ त्यांनी मान्य केले की, चोराडे फाटयावर चायनीज, वडापाव, चहाची वगैरे भरपूर दुकाने आहेत. सदर ठिकाण चौक असल्याने गाडीसाठी तेथे लोक थांबतात. त्यांनी छापा टाकलेल्या मिळकतीचा क्रमांक त्यांना सांगता येणार नाही तसेच जप्त केलेल्या सिलेंडरचे वजन व बॅच क्रमांक सांगता आला नाही. सदर साक्षीदाराने उलटतपासात सर्व सुचक प्रश्नांना नकारार्थी उत्तरे दिली.

**१३.** अभियोगपक्षाचा पुरावा पाहता असे दिसून येत आहे की, साक्षीदार क्र. १ व २ हे दोन्ही पोलिस साक्षीदार आहेत. साक्षीदार क्र. १ व २ यांनी मान्य केले की, चोराडे फाटा येथे चायनीज, वडापाव, मिठाई व इतरही दुकाने असून सदर परिसर गजबजलेला असतो. परंतू तपासी अंमलदार यांनी एकही स्वतंत्र साक्षीदाराचा जबाब नोंदविलेला नाही. तसेच अभियोगपक्षाने देखील तसा स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही. यावरुन देखील अभियोगपक्षाचा पुरावा विश्वासनीय वाटत नाही. साक्षीदार क्र.१ व २ यांनी ज्या ठिकाणी छापा मारला त्या ठिकाणाचा मिळकत क्रमांक त्यांना सांगता आला नाही. तसेच जप्त केलेल्या सिलेंडर बॅच नंबर त्यांना सांगता आला नाही. यावरुन देखील घटनास्थळावर छापा टाकला व तेथून सिलेंडर जप्त केला यावर संशय निर्माण होतो.

**१४.** अभियोगपक्षाने जप्ती पंचनाम्यावरील पंचांची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे जप्ती पंचनामा संशयापलीकडे शाबित झाला नाही. घटनास्थळातील जागा कोणाच्या मालकीची आहे याबाबत अभियोगपक्षाने पुरावा सादर केला नाही.

अभियोगपक्षाने घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाणी असताना देखील घटनास्थळाच्या आजुबाजूच्या साक्षीदाराचे जबाब नोंदवले नाहीत.

**१५.** साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहाय्य होईल असा कोणताही पुरावा अभिलेखावर दिलेला नाही. साक्षीदार क्र. १ व २ च्या पृष्टयर्थ इतर स्वतंत्र साक्षीदारांच्या साक्षीच्या पुष्टी अभावी तो पुराव्याकामी ग्राहय धरता येणार नाही. अभियोगपक्षाच्या पुराव्यावरुन आरोपीविरुध्द केलेले आरोप संशयापलीकडे शाबित होत नाहीत. अशा परिस्थितीत आरोपीस दोषमुक्त करणे न्यायोचित ठरते. सबब अभियोगपक्ष आरोपीविरुध्दचे दोषारोप संशयापलीकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. वरील सर्व पुराव्यावरुन आरोपी विरुध्द कोणताही गुन्हा शाबीत होत नसल्यामुळे मी मुद्दा क. ०१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. २ करीता**:–

**१६.** जप्त मुद्देमाल एक लाल रंगाची एच. पी. कंपनीची वापरातील सिलेंडरची गॅस टाकी ही पोलिसांच्या ताब्यात दिसते. सबब जप्त मुद्देमाल अपील कालावधीनंतर पुरवठा अधिकारी, तहसिल कार्यालय वडूज, जिल्हा सातारा यांचे ताब्यात कायदेशीर विल्हेवाट करण्याकरीता देणे न्यायोचित होईल. अभियोगपक्षाने मुद्दा क्र. १ च्या निष्कर्षावरुन आरोपी दोषमुक्त होण्यास पात्र आहे. सबब, मी मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

–: **आ दे श :–**

०१. आरोपी जगन्नाथ बबन पिसाळ यांची भारतीय दंड विधान संहिताचे कलम २८५ मधुन फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५ (१) नुसार निर्दोष मुक्तता करणेत येत आहे.

०२. आरोपीचा जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

०३. जप्त मुद्देमाल एक लाल रंगाची एच. पी. कंपनीची वापरातील सिलेंडरची गॅस टाकी ही अपील कालावधीनंतर पुरवठा अधिकारी, तहसिल कार्यालय वडूज, तालुका खटाव, जिल्हा सातारा यांचे ताब्यात कायदेशीर विल्हेवाट करण्याकरीता देण्यात यावी. त्या अनुषंगाने संबंधीत पोलिस स्टेशन व पुरवठा अधिकारी, तहसिल कार्यालय वडूज यांना पत्र पाठवावे.

०४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ च्या पुर्ततेकामी रक्कम रुपये १५,०००/– चे वैयक्तीक जात मुचलका व त्याच रकमेचा एक जामीनदार सादर करावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला.)

MOHAMMED IMRAN DARYAWARDI
Digitally signed by MOHAMMED IMRAN DARYAWARDI
Date: 2026.07.08 14:31:26 +0530

ठिकाण : वडूज. (एम.आय.एस.दर्यावर्दी)

दिनांक : ०८.०७.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,

वडूज, जिल्हा सातारा.

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी प्रमाणीत करतो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द–न–शब्द मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नांव – आर. आर. जाधव

न्यायालयाचे नांव – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वडूज.

लघुलेखक–III